# कंकालेश्वर जमिनीच्या खरेदी विक्रीत करोडो रूपयांची उलाढाल

## जिल्हाधिकारी साहेब, 'त्या'सात भूमाफियांना तातडीने गुन्हा दाखल करून अटक करण्याचे आदेश द्या

बीड (सरकार): शहरातील सात भूमाफियांनी एकत्र येऊन कंकालेश्वर जमिनीची शंभर रूपयांच्या बॉण्डवर विक्री केली. आणि नामानिराळे झाले. मात्र नंतर या जमिनीवर प्लॉटींग पाडून करोडो रूपयांची उलाढाल झाली आहे . त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने या गंभीर बाबीची दखल घेत त्या सात भूमाफियांना देवस्थानची जमीन खरेदी विक्री संदर्भात तातडीने गुन्हा दाखल करून अटक करण्याचे आदेश द्यावेत अशी चर्चा होत आहे.



त्याच बरोबर अतिक्रमण धारकांकडून पैसे गोळा करणारे कोण? आणि शंभर रूपयांचे बॉण्ड ज्याने आपल्या मालकी हक्कप्रमाणे या गोरगरीबांकडून लाखो रूपये घेऊन कोटच्याधीश झाले ते बॉण्ड परत घेण्यासाठी आता हेच भूमाफिया मोठे षडयंत्र रचत आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेत या भूमाफियांवर तातडीने कारवाई करावी अशी चर्चा होत आहे.

जगप्रसिध्द कंकालेश्वर मंदिरच्या मालकीची ५५ एकर जमीन असल्याचे अधिकृतपणे सांगितले जात आहे. मात्र या ठिकाणी शंभर रूपयांच्या बॉण्डवर आपणच कंकालेश्वर जमिनीचे खरे मालक आहोत व आपल्यालाच अधिकार दिला आहे . असे गंभीरपणाने वागून या जमिनी भूमाफियांच्या घशात घातल्या. भूमाफियानेही भांडण तंटे लावून या जमिनीतून प्लॉटींग पाडून करोडपती झाले . मात्र आता प्रशासन अतिक्रमण धारकांवर कारवाईसाठी सज्ज झाले असताना हेच भूमाफिया आता ज्या लोकांना शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमीन विक्री करून दिली. ते बॉण्ड परत घेण्यासाठी पैसे जमवून बॉण्ड परत घेतले जाणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे भूमाफिया या गोरगरीबांकडून पैसे घेऊन दिलेला पुरावा नष्ट करण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कंकालेश्वर जमिनीमधील अतिक्रमण धारकांनो



ज्यांच्याकडून जमिनी शंभर रूपयांच्या बॉण्डवर खरेदी केल्या, त्यांच्याकडून पैसे वुसल करा . स्वत:कडील बॉण्ड या भूमाफियांना देऊ नका . कारण पुरावा नष्ट करण्याचे षडयंत्र हे भूमाफिया करत असल्याचे बोलले जात आहे. देवस्थानच्या जमिनीची प्लॉटींग पाडून विल्हेवाट लावणाऱ्या या सात लोकांना जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या कॅबिनमध्ये बोलावून या जमिनी कशा विकल्या, कोणत्या अधिकाऱ्याने विकल्या याची माहिती घेऊन तातडीने गुन्हा दाखल करून अटक करण्याचे आदेश द्यावेत अशी चर्चा आता अतिक्रमण धारकांमध्ये होत आहे.


सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २२१ वा ■ मंगळवार २९ एप्रिल २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक ३० एप्रिल २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 221 ■ Tuesday 29 April 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# परळी नगरपरिषदेत पाणीपुरवठ्यात मोठा घोटाळा?

## एकाच ठेकेदाराला५ वर्षे कार्यादेश-गायब मोटारी,बनावट बिलांचा पर्दाफाश!

### मुख्याधिकारी इंजिनियरसह, अधिकाऱ्याचा भ्रष्टाचारात समावेश?







परळी (सरकार): परळी नगरपरिषदेमध्ये गेल्या पाच वर्षांपासून पाणीपुरवठा विभागात सुरू असलेल्या ठेकेदारी प्रकरणात मोठा घोटाळा समोर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एकाच ठेकेदाराला वर्षानुवर्षे पाणीपुरवठा कामाचा कार्यादेश दिला जात असून, त्यामध्ये गंभीर आर्थिक अनियमितता झाल्याचे प्राथमिक तपासात आढळले आहे.

विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी बोरवेलच्या मोटारी गायब असूनही त्यांचे नवीन बिल नगरपरिषदेकडून मंजूर करण्यात आले आहे. काही ठिकाणी जुन्याच मोटारी पुन्हा बसवून नवीन बिलं उचलण्यात आली, ज्यामुळे सरकारी निधीचा सरळसरळ अपव्यय झाल्याचं स्पष्ट होत आहे.

या सगळ्या प्रकरणात पाणीपुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची संमती किंवा सहभागाशिवाय हे शक्य नसल्याने, अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याचा संशय व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिक व समाजकार्यकर्त्यांनी या गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे. नगरपरिषदेचा कोटचवधींचा निधी एका ठराविक गटाच्या फायद्यासाठी वापरला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. हे प्रकरण सध्या जिल्हा प्रशासनाच्या लक्षात आलं असून, लवकरच उच्चस्तरीय चौकशी होण्याची शक्यता आहे. दोषींवर कारवाई झाली नाही, तर लोकआंदोलन उभं करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या नातेवाईकांना
# ५० लाख आणि सरकारी नोकरी

### कॅबिनेट मंत्री मंडळाचा मोठा निर्णय

मुंबई (सरकार): पहलगाम हल्लयामध्ये महाराष्ट्रातील मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५० लाख रुपयांचे अर्थसहाय्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच या मृतांमधील प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. संतोष जगदाळे यांच्या कन्या असावरी जगदाळे यांना सरकारी नोकरी देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पहलगाम हल्लयातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर राज्यातीलस सहा मृतांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी घोषणा केली. तसेच प्रत्येक कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कुटुंबांच्या शिक्षण, रोजगाराकडे राज्य सरकार लक्ष देणार आहे. या आधी असावरी जगदाळेंना पुण्यातील डी वाय पाटील संस्थेमध्ये नोकरी देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता त्यांना सरकारी नोकरी देण्याचा निर्णय झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा विशेषाधिकार वापरून मृतांच्या कुटुंबातील एकाला सरकारी नोकरी देण्याता निर्णय घेतला आहे. असावरी जगदाळे यांनी कॉम्प्युटर सायन्समधून बीएसस्सी केली. त्यानंतर एमबीएची पदवी घेतली. नंतर त्यालाच पुरक असा लेबर लॉचा डिप्लोमा केला आहे. आता आमचे जे नुकसान झाले आहे ते कुणीही भरून काढू शकत नाही. पण आता मुलीला सरकारी नोकरी मिळाली

महाराष्ट्रातील मृतांची नावे १) अतुल मोने - डोंबिवली २) संजय लेले - डोंबिवली ३) हेमंत जोशी- डोंबिवली ४) संतोष जगदाळे- पुणे ५) कौस्तुभ गणबोटे- पुणे ६) दिलीप देसले- पनवेल

# गेवराई पोलीस निरीक्षक प्रवीण बांगर यांच्यावर लाच मागणीचा गंभीर आरोप

### शेख शमीमबी इस्माईलची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

बीड (सरकार): गेवराई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. प्रवीणकुमार बांगर यांच्यावर लाच मागणीचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याबाबत शेख शमीमबी इस्माईल (रा. तय्यब नगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड) यांनी बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयात दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी लेखी तक्रार दाखल केली आहे. लाचलुचपत प्रतिबंध कायदा, १९८८ अंतर्गत कारवाईची मागणी करणाऱ्या या तक्रारीमुळे पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे.तक्रारीची माहिती

शेख शमीमबी इस्माईल यांनी तक्रारीत नमूद केली आहे की, त्यांनी दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी गेवराई पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांच्याकडे लेखी फिर्याद दाखल केली होती. या फिर्यादीत रिजवान इरफान फंगारी, ताहेरा इरफान फंगारी, जीवन विठ्ठल साळवे, प्रकाश विठ्ठल साळवे आणि मैमुन फंगारी यांच्यावर बळजबरीने चोरी, मारहाण आणि घरातील मौल्यवान वस्तू तसेच सोन्याचे दागिने चोरण्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, पोलीस निरीक्षक बांगर यांनी सदर तक्रारीची कोणतीही दखल घेतली नाही, असे तक्रारदाराने म्हटले आहे.तक्रार दाखल न झाल्याने शेख शमीमबी यांनी दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयाला टपालाद्वारे याबाबत कळविले होते. तरीही कोणतीही कारवाई न झाल्याने त्यांनी आता लाच मागणीच्या गंभीर प्रकरणासह थेट पोलीस अधीक्षकांकडे धाव घेतली आहे.

तक्रारीनुसार, शेख शमीमबी यांनी त्यांची फिर्याद दाखल करण्यासाठी पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांना वारंवार भेटले. यावेळी बांगर यांनी थेट दोन लाख रुपये (रु. २,००,०००/-) लाचेची मागणी केल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. विशेष म्हणजे, बांगर यांनी तक्रारदाराला सांगितले की, आरोपींकडून तक्रार दाखल न करण्यासाठी मी दीड लाख रुपये (रु. १,५०,०००/-) घेतले आहेत. तुमची तक्रार दाखल करायची असेल तर दोन लाख रुपये आणा. हा संवाद स्वतः तक्रारदारासमोर झाल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

शेख शमीमबी इस्माईल यांनी आपल्या तक्रारीत पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंध कायद्यांतर्गत तातडीने गुन्हा दाखल करून चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, त्यांनी दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी दाखल केलेल्या मूळ तक्रारीवर तपास सुरू करण्याची विनंती केली आहे. या प्रकरणामुळे गेवराई परिसरात पोलीस खात्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# लोकाभिमूख व गतिमान अभियान राबवावे-जिल्हाधिकारी जॉन्सन

### १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा बैठकीत आवाहन

बीड (सरकार): १०० दिवसाच्या कार्यक्रमात जिल्हयातील प्रत्येक अधिका-यांनी नाविण्यपूर्ण,लोकाभिमूख, गतीमान अभियान राबवून स्वच्छता ठेवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिमेचा दुस-या टप्प्यातील कार्यालयाचा मुल्यामापन अहवाल आढावा व्ही.सी व्दारे घेण्यात आला. या प्रसंगी त्यांनी हे आवाहन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी



अधिकारी,आदित्य जिवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेस सुर्यवंशी तसेच विविध कार्यालयाचे कार्यालय प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी म्हणाले की, बीड जिल्हयामध्ये कार्यालयीन स्वच्छतेचा अभाव आढळून आला असून कार्यालयीन स्वच्छता हा पाया असून स्वच्छतेला प्रथम प्राधान्य द्यावे तसेच ही स्वच्छता केवळ अभियानापुरतीच मर्यादित न ठेवता कायम स्वरुपी ठेवावी.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणेत कार्यालयाचा कायापालट, शौचालय, पिण्याचे पाणी, कार्यालयीन स्वच्छता, कर्मचा-यांच्या टेबलवर नेम प्लेट, थम मशीन या सुधारणेला गतिमानता मिळावी. नागरिकांसोबत व्यवहार करतांना संवेदनशिलपणे करावा. कार्यालय प्रमुखास काही अडचणी असेल तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधवा, प्रंलबित विषयी लवकरात लवकर सोडवावे यासंदर्भात अडचणी असेल तर टिपणी टाकावी किंवा ते काम का प्रलंबित आहे ते मुद्दे माझ्या निदर्शनास आणून द्यावेत. आपणास निधीची कमतरता असेल तर डिपीसीतून निधीची मागणी करावी, निधीची उपलब्धता करून दिली जाईल. १०० दिवसाची कार्यालयीन मोहिम दुस-या टप्प्यातील कामाची पीपीटी २ मे २०२५ पर्यंत कार्यालय प्रमुखाने सादर करावी अशी सूचना त्यांनी यावेळी केली. आपल्या काही नाविन्यपूर्ण कल्पना असतील तर त्याही मांडाव्यात त्याचा जरुर विचार केला जाईल, जेणे करुन कार्यालये आणि सोबतच जिल्हयातील स्वच्छतेचाही प्रश्न सुटेल. असे ते म्हणाले.

# वाहेगावात माय,लेकराची आत्महत्या

बीड (सरकार): गेवराई तालुक्यातील वाहेगाव आमला येथे हृदयद्रावक घटना घडली आहे.एका तरुणाने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या आईनेही प्रचंड दुःखातून आत्महत्येचा मार्ग पत्करला. या दुहेरी घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

अभिमान खेत्रे (वय अंदाजे ३५) या तरुणाने काल (दि. २८ एप्रिल) दुपारी फाशी घेत आपले जीवन संपवले. ही माहिती आई कौशल्या भागुजी खेत्रे (वय अंदाजे ७०) यांना कळताच त्या प्रचंड मानसिक तणावात आल्या आणि त्यांनीही काही वेळातच विषारी औषध सेवन केले. अभिमानचा मृत्यू काल सायंकाळी चार वाजता झाला, तर आई कौशल्याबाईंचा मृत्यू आज (दि. २९ एप्रिल) सकाळी दहा वाजता उपचारादरम्यान झाला. एका घरात एकाच वेळी दोन मृत्यू झाल्याने संपूर्ण गावात हळहळ व्यक्त केली जात असून नातेवाईक, शेजारी आणि गावकरी मोठ्या दुःखात आहेत. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## विशेष वृत्त

# मांजरा विकास प्रतिष्ठाणचा सन्मान सोहळा उत्साहात



**पैठण** : के ज तालुक्यातील नायगाव येथील मांजरा विकास सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विधी, कृषी, उद्योग अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा गौरव सन्मान पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून दिलीप भिसे तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आ. पृथ्वीराज साठे, माजी जि.प. सदस्य सुरेश पाटील, शेतकरी नेते भाई मोहन गुंड छावा मराठा संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी ठोंबरे, सरपंच विवेक खोडसे, चेअरमन रामकिसन खोडसे उपस्थित होते. मांजरा विकास सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक, आरोग्य क्षेत्रातील डॉ. नरेंद्र काळे विधी, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल ॲड. माधव जाधव, कृषी क्षेत्रातील रवींद्र देवरवाडे, सुहास पंखे तसेच शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श शिक्षिका म्हणून रंजना जाधव, सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल जनविकास सामाजिक संस्थेचे रमेश भिसे, उद्योग क्षेत्रातील गणेश शिर्के यांना गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण खोडसे, गोविंद नाना शिनगारे, अमोल गोरे, बप्पा गोरे, भगवंत मोरे, व सर्व संचालक मंडळ मांजरा विकास प्रतिष्ठान नायगाव आणि नायगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.


## दिव्यांगांच्या प्रमाणपत्राची घरीच होणार तपासणी

**बीडः**बीड तालुक्यातील दिव्यांग निराधार व विविध योजनेतील लाभार्थ्यांना अपंगत्वामुळे हालचाल करता येत नसेल किंवा तहसील कार्यालयात येता येत नसेल तर अशा लाभार्थ्यांच्या कागदपत्राची (डीबीटी) आता घरीच पडताळणी होणार असून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी केले आहे. संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना, दिव्यांग लाभार्थी अतिवृद्ध व्यक्ती, असतील ज्यांना हालचाल करणे अशक्य आहे व जे तहसील कार्यालय किंवा डीबीटी कॅम्पसाठी येऊ शकत नाहीत. त्यांचे आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक आणि मोबाईल नंबर संबंधित सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यामार्फत तहसीलदार कळवावे, त्यांची (डीबीटी) कागदपत्राची पडताळणी घरबसल्या करून घेतली जाईल योजनेचा लाभघ्यावा असे आवाहन नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी केले आहे.

## दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचे आयोजन

**बीडः** तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिर बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे शुक्रवार दि.२ ते १२ मे या कालावधीत होत आहे. प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडकडून आयोजित शिबिरात नाव नोंदणीसाठी १५ वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे. सध्या मुलांच्या शाळेला सुद्ध्या लागल्या आहेत. हा सुद्द्यांचा काळ आपल्या लहान तरुण मुलांना त्यांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरिता महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांना सदर शिबिरात सहभागी करावे. त्यासाठी पालकांनी आपल्या १५ वर्षावरील मुलांचे नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा. असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## युपीएससीतील गुणवंतांचा बीडमध्ये सत्कार



**बीड** : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत दैदिप्यमान यश संपादन करणाऱ्या बीड जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रा. सुशीला मोराळे यांनी सत्कार केला. यावेळी त्यांनी या विद्यार्थ्यांनी बीड जिल्ह्याचे नावलौकिक वाढवल्याची भावना व्यक्त केली. विद्यार्थ्यांसमोर बोलताना प्रा. मोराळे म्हणाल्या, बीड जिल्हा हा फक्त ऊसतोडणी मजुरांचा नसून आता भारतीय प्रशासनातही स्थान मिळवणारा म्हणून जिल्ह्याची ओळख पंकज आवटे संभाजी मुंडे व सुशील गीते यांनी निर्माण केली आहे. कायम दुष्काळग्रस्त असलेला हा जिल्हा या ना त्या कारणामुळे राज्यात गाजत असतो मध्यंतरी संतोष देशमुख हत्यानंतर जिल्हा राज्यात बदनाम झाला काही माणसे वाईट असू शकतात सगळा जिल्हा वाईट असू शकत नाही. जातीतील काही माणसे वाईट आहेत म्हणून सगळी जात बदनाम करण्याचे प्रयत्न मात्र आजही गुणवत्तेत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवला आहे.

# विकसित भारत घडवायचा असेल तर सांस्कृतिक मूल्ये जपण्यावर भर द्या-डॉ. उदय निरगुडकर





केज (प्रतिनिधी): आपल्या मुलांचे चांगले भविष्य घडवायचे असेल तर आपण त्यांना शाळेमध्ये पाठवतो, आजारी पडल्यानंतर डॉक्टरांचा सल्ला घेतो तसेच आपली तब्येत चांगली हवी असेल तर आपण जिम लावतो. या प्रक्रियेमध्ये आपल्याला काहीही करावे लागत नाही. कारण बदल घडवून आणण्याची जबाबदारी ही डॉक्टर, शाळा तसेच जिम मालकांची असते. तसेच राज्य चालवण्याची जबाबदारी ही आपण निवडून दिलेल्या सरकारची असते. जर त्यांनी योग्य पद्धतीने समाजाचे प्रश्न सोडवले नाही तर आपण दुसरे सरकार निवडून आणतो. ही एक प्रक्रिया आहे. स्वतंत्र भारताची पहिली निवडणूक १९५२ मध्ये झाली. पुढील काळात १९६२ मध्ये चीनचे आक्रमण, १९७१ मध्ये पाकिस्तानच्या आक्रमणाने भारताच्या विकासाला ग्रहण लागले. हीच पार्श्वभूमी १९७७ च्या निवडणुकीला होती. त्यातच राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा, जनता पक्षाचे अपयश या घडामोडीमुळे निर्माण झालेली राजकीय अस्थिरता, अशी परिस्थिती हेतू आणि कृती यांच्यामध्ये अंतर असलं की असे घडतच असते. सन १९८९ च्या निवडणुकीनंतर कोणत्याही पक्षाला बहमत न मिळाल्याने आघाडी सरकारे केंद्रात च राज्यात सत्तेमध्ये आली. पूर्वी राजेशाही होती तेंव्हा यथा राजा तथा प्रजा असे म्हटले जायचे, लोकशाही आल्यानंतर यथा प्रजा तथा राजा असे म्हटले जाते. जवळपास ८६ देशांचा मी प्रवास केला. परंतु एका देशाचा प्रवास करताना मला जाणवले, की असं कधीच होत नाही. सामान्य माणूस मोठा आणि देश छोटा, किंवा सामान्य माणूस छोटा आणि देश मोठा. देश छोटा म्हणजे, सामान्य माणूस हतबल व गुलामगिरी मानसिकतेचा असतो. सन १७५७ मध्ये रॉबर्ट क्लाइव्ह या इंग्रज शिपायाच्या अवघ्या ३ हजार सैन्याने नवाच सिराज उद्द्योलाच्या ५० हजार सैन्याचा पराभव केला. विजयाचा जल्लोष साजरा करताना १ लाख लोक पाहत होती. जर त्यांनी ठरवलं असतं तर त्या मूठभर

सैनिकांचा नायनाट होऊ शकला असता परंतु सामान्य माणूस एकवटला नव्हता कारण तो हतबल व गुलाम झाला होता. दुसरी बाजू सन १६८० मध्ये छत्रपती शिवरायांचे निधन झाले. १६८९ मध्ये संभाजी महाराजांनी बलिदान दिले. पुढे राजाराम महाराजांचा मृत्यू झाला, परंतु पुढील २७ वर्ष अफगाणिस्तानापासून तुंगभद्रापर्यंत विस्तार केलेल्या क्रूर, पाशवी शासकाला मराठ्यांनी झुंजवत ठेवत इथेच गाढलं. म्हणूनच यथा राजा तथा प्रजा या उक्तीप्रमाणे आजही छत्रपती शिवरायांची जयंती अत्यंत हर्षीत्साहात साजरी केली जाते. अर्थात देशाला विकसित बनवायचे असेल तर माणसे मोठी झाली पाहिजेत तर देश मोठा होईल. जर आपल्याला खऱ्या अर्थानि विकसित भारत घडवायचा असेल तर आपली सांस्कृतिक मूल्ये जपण्यावर भर दिला पाहिजे, तसेच नवकल्पना आणि पायाभूत सुविधांना चालना दिली पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई येथील जेष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांनी केले. केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २६ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे समारोपाचे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून मुंबई येथील जेष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर ही उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून श्री. प्रकाश महाजन ज्येष्ठ नेते मनसे, यांनी उपस्थिती दर्शवली. इतर उपस्थित मान्यवरांमध्ये रमेशराव आडसकर अजित पवार राष्ट्रवादी गट माजलगाव मतदार संघ, प्रकाश भन्साळी तसेच जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी. ची. गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजिलोद्दीन काजी, नारायण अण्णा अंधारे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राचार्य शंकर भैरट, प्रा. वि. चे मु. अ. वसंतराव शितोळे आदी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपात प्रकाश महाजन म्हणाले, उदय निरगुडकर यांची शैक्षणिक कारकीर्द अत्यंत वैभवशाली आहे. तसेच इतिहासाचा फार मोठा वारसा उदयजींना लाभलेला आहे. राष्ट्राच्या हितासाठी त्यांच्या पूर्वजांनी देखील बलिदान दिलेले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निशिगंधा क्षीरसागर यांनी केले तर आभार व्यक्त करताना रघुनाथ चौरे यांनी यावर्षी २५ व्या वर्षात पदार्पण केलेल्या स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेसाठी निमंत्रित सन्माननीय व्याख्याते व अध्यक्षांचेही मनःपूर्वक आभार मानले. तसेच या कार्यक्रमाला आपल्या दैनिकातून प्रसिद्धी देऊन सहकार्य केलेल्या सर्व पत्रकार बंधूंचेही मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## वडवणी रेल्वे स्टेशनला संत सेवालाल महाराज यांचे नाव द्या

**वडवणी (प्रतिनिधी):-** येथील रेल्वे स्टेशनला क्रांतिकारी संत सेवालाल महाराज यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी बंजारा पँथरचे अध्यक्ष इंजि. रोहिदास पवार यांनी केली आहे. त्यांनी म्हटले की, सेवालाल महाराज हे बंजारा समाजाचे आराध्य दैवत असून, इंग्रज काळात समाजाच्या व्यापारी व्यवसायावर लदनी मार्गावरून आज भारतात अनेक रेल्वे मार्ग तयार झाले आहेत.

बंजारा समाज मागील दहा वर्षांपासून वडवणी रेल्वे स्टेशनला सेवालाल महाराजांचे नाव देण्यासाठी प्रयत्न करत आहे. ३ जुलै २०१९ रोजी बंजारा पँथरच्या शिष्टमंडळाने तत्कालीन रेल्वेमंत्री पियुष गोयल यांना निवेदन दिले होते. आता लवकरच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना आलेल्या संकटाचा त्यांनी तीव्र विरोध केला होता. त्यांच्याच देखील निवेदन देण्यात येणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

# शहरात पाणीबाणी, खाजगी टँकर चालकांनी दर वाढविले

## १००० लिटर पाण्यासाठी मोजावे लागतात ४०० रूपये

**बीड (प्रतिनिधी):-** गेल्या २५ दिवसांपासून शहराला पाणीपुरवठा बंद असल्याने ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली असून पालिकेचा पाणी पुरवठा बंद असल्याचा फायदा घेत खाजगी टॅकर चालकांकडून नागरिकांची लुट सुरू आहे. १००० लिटर पाण्यासाठी ३०० ते ४०० रूपये, २५०० लिटर पाण्यासाठी ७०० ते १००० रूपये घेतले जात असल्याने विकतचे पाणी घेवून नागरिकांना आपली तहान भागवावी लागत आहे. बीड शहरातील पाणी प्रश्न गंभीर स्वरूप धारण करीत असून गेल्या २५ दिवसांपासून नळाला पाणी आले नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. ज्या ठिकाण पाणी उपलब्ध आहे अशा ठिकाणी पाणी भरण्यासाठी रांगा लागल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील राजीव गांधी चौकात असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ पाण्यासाठी २४ तास नळ सुरू असतात, या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात खाजगी पाणी पुरवठ्याचे दर निश्चित करावेत बीडमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पाणी आले नसल्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे. शहरात खाजगी पाणी पुरवठा करणाऱ्या टॅकर्स चालकांसाठी प्रशासनाने दर निश्चित करावेत अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे. गर्दी होत आहे. पाण्यासाठी अनेकांनी खाजगी टँकरचा पर्याय निवडल्यामुळे शहरात जवळपास २५० ते ३०० छोटे मोठे टँकर पाणी पुरवठा करीत आहेत. मात्र मागणी वाढल्यामुळे या टेंकर चालकांनी आपले भाव वाढविले असून १००० हजार लिटरसाठी ३०० ते ४०० रूपये मोजावे लागत आहेत. तर २५०० लिटरसाठी ८०० ते १००० रूपये दर आकारले जात असल्याने हे विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. पाण पुरवठा करणाऱ्या पाईप लाईनच्या दुरूस्तीचे काम पालिकेने हाती घेतल्यामुळे शहरात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे. हे काम तातडीने पूर्ण करून शहरातील पाणी पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी होत आहे.

## कर्णधार प्रियंका इंगळे यांना चंपावतीरत्न पुरस्कार प्रदान




**बीड (प्रतिनिधी):-** विश्वविजेत्या भारतीय संघाची कर्णधार प्रियंका हनुमंत इंगळे यांना चंपावतीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आ. सुनील धांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुरेश साबू, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागार, वर्षा दिक्कत यांच्या उपस्तिथ कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते विश्वविजेत्या भारतीय खो खो संघाची कर्णधार प्रियांका हनुमंत इंगळे याना शाल, हार सन्मानपत्र फेटा देऊन सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय समारोप करताना माजी आ. सुनील धांडे यांनी रोटरी क्लब ऑफ बीड ने दिलेल्या पुरस्काराचा पाढाच वाचला. आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा घेताना म्हणाले कि रोटरी क्लबने २१ चंपावती रत्नपुरस्कार देऊन बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रामध्ये झेप घेणाऱ्यांची सन्मान केलेला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन अरोटेरीयू क्लब ऑफ बीड अध्यक्ष डॉ. मेघराज पिंगळे, सचिव संदीप खोड व सर्व सहकार्यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष मेघराज पिंगळे, संदीप खोड, सुरेशजी लड्डा, सुहास बेद्रे व सर्व रोटरीच्या सदस्यांनी खूप परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता पहलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण अर्पण केली व राष्ट्रगिताणें झाली

## कायमस्वरूपी सेवेत रूजु करण्याची मागणी

**माजलगाव (प्रतिनिधी):** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मागील अनेक वर्षांपासुन पहारेकरी या पदावर २०१० पासुन सेवा केली असुन बाजार समितीमध्ये कायमस्वरूपी रूजु करून घ्या अशी मागणी संतोष शाम टाकणखार यांनी सभापती, सचिव यांचेकडे निवेदनाव्दारे केली असुन निवेदनाची दखल न घेतल्यास दि. १ मे कामगार दिनापासुन उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दि. २४/०२/२०१० पासुन आजघडीला सुमारे पंधरा वर्षे पहारेकरी पदावर बाजार समितीमध्ये नियमीत प्रमाणिक सेवा केली असुन वारंवार पत्र व्यवहार करूनहही सभापती, सचिव यांचेशी चर्चा करून निष्ठावंत कर्मचा-यावर अन्याय केला आहे. त्यामुळे माझा कार्यकाळ पाहता प्राधान्याने कायमस्वरूपी सेवेत समावुन घ्यावे अन्यथ बाजार समिती कार्यालयासमोर दि. १ मे कामगार दिनापासुन उपोषण करण्याचा इशारा संतोष टाकणखार यांनी दि. २४ एप्रिल २०२५ रोजी सभापती, सचिव यांना निवेदनाव्दारे दिला आहे.

# मानसिक आरोग्य महिला सबलीकरणाची ताकद-डॉ. कुलकर्णी

**गेवराई (प्रतिनिधी):-** जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथील गृहशास्त्र विभाग, लायब्ररी यांच्या संयुक्त विद्यमानों 'महिला सबलीकरण संधी व आव्हाने' या विषयावर एक दिवसीय आंतरविद्याशाखीय ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात उद्घाटक म्हणून रणवीर पंडित, तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे उपस्थित होते. या चर्चासत्रासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुनीता चांदोरकर वरिष्ठ प्राध्यापक, डिपार्टमेंट ऑफ फूड्स अँड न्यूट्रिशन, पॅक्रल्टी ऑफ फॅमिली अँड कम्युनिटी सायन्सेस महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बडोदा वडोदरा, दुसऱ्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गौरी कुलकर्णी मानसशास्त्र विभाग प्रमुख, श्री शाहू मंदिर महाविद्यालय पुणे या होत्या. या चर्चासत्रात उद्घाटक म्हणून बोलत असताना रणवीर पंडित यांनी यांनी मार्गदर्शन केले. महिलांना, औद्योगिक, सामाजिक, राजकीय, कुटुंबिक, अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्य करत असताना येणाऱ्या अडचणी, समाजाचा महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांना दिली जाणारी वर्तणूक इत्यादी बाबीवर त्यांनी सविस्तरपणे प्रकाश टाकला. व खऱ्या अर्थाने महिला सबलीकरण साध्य करावयाचे असेल तर त्यांच्यातील क्षमतांप्रमाणे त्यांना त्यांचे अस्तित्व सिद्ध करण्याची संधी द्या त्यांना निर्णय स्वातंत्य द्या जेणेकरून त्या त्यांची स्वओळख निर्माण करू शकतील. त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करा अशी प्रतिपादन त्यांनी केले. या चर्चासत्राच्या दुसऱ्या प्रमुख मार्गदर्शक डॉ गौरी कुलकर्णी यांनी महिला सबलीकरण व त्यांचे मानसिक आरोग्य याचा सहसंबंध विविध उदाहरणाच्या आधारे सविस्तर स्पष्ट केले. महिला सामाजिक, राजकीय शैक्षणिक इ. बाबतीत जेव्हा सशक्त होतात तेव्हाच त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राहते. चांगले मानसिक आरोग्य ही स्त्री सबलीकरणाची ताकद आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी त्यांनी मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी विविध टिप्स सांगितल्या यामध्ये भावनिक समतोल, सकारात्मक नातेसंबंध, वेळेचे नियोजन, वेळापत्रकानुसार काम, सकारात्मक विचार, मनाप्रमाणे जगणे, स्वयंशिस्त पाळने, अपराधीपणा टाळणे, सोशल मीडियापासून दूर राहणे, आत्मसन्मान ठेवणे, भूतकाळातील चांगले आठवणींना उजळणी देणे चा समावेश होता. या चर्चासत्राच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वास कदम यांनी असे प्रतिपादन केले की महिला या जन्मापूर्वीच असुरक्षित झाल्या आहेत आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये लिंग असमानता सध्याच्या काळात निर्माण झालेल्या स्त्रीअत्याचाराच्या समस्या यामुळे स्त्रीभ्रूणहत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. महिला अत्याचाराच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. यावर उपाययोजना होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येकाने आपल्या कुटुंबापासून सुरुवात करावी. घरामध्ये समानता, महिलाना सन्मान देणे इ गोष्टीची रुजवणूक केली तर ती पुढील पिढीत संक्रमित होईल शालेय व महाविद्यालयीन मुलींसाठी विविध प्रकारचे आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण शिबिर, विविध जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभाग तबस्सुम इनामदार, प्रास्ताविक गृहशास्त्र विभाग प्रमुख प्रोफे. डॉ राणी जाधव, पाहुण्याचा परिचय आयक्यूएसी समन्वक तथा गृहशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. अयोध्या पवळ तर आभारप्रदर्शन ग्रंथपाल डॉ. महारुद्र गव्हाणे यांनी केले.

# तहसीलदारांचा पुढाकार आणि आजींना मिळाले अनुदान

बीड (सरकार): डीबीटीची प्रक्रिया उशिरा केल्याने कुमशीच्या केशरबाई मंचारे या ८० वर्षीय आजीना अनुदान मिळत नव्हते . या आजी तहसील कार्यालयात येरझऱ्या मारत होत्या . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आजींकडे पाहिले आणि त्यांना कामाबाबत विचारणा केली . डीबीटी प्रक्रिया उशिरा झाल्याने आजींचे अनुदान मिळाले नव्हते . तात्काळ तहसीलदार शेळके यांनी सीएससी सेंटर चालकास सूचना देत आजींची डीबीटी प्रक्रिया तातडीने करून घेण्याचे आदेश दिले . त्यानुसार केंद्र संचालक सतीश जाधव यांनी सर्व प्रक्रिया केली . आजींच्या खात्यावरील दहा हजार रुपये रोख रक्कम काढून आणण्यात आली . ही रक्कम तहसीलदारांच्या हस्ते आजींना सुपूर्द करण्यात आली . त्यामुळे आजींनी सर्वांचे आभार मानले.

यावेळी तहसिलदार चंद्रकांत शेळके , पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर , संजय गांधी निराधार विभागाच्या अव्वल कारकून हेमलता परचाके , तलाठी लक्ष्मण आगलावे , संजय गांधी निराधार विभागाच्या महसूल सहायक वैशाली बहीरवाळ , सतीश जाधव , संतोष काकडे आदिंची उपस्थिती होती .

सध्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाभरात संजय गांधी , श्रावणबाळ विभागामार्फत गावोगावी कॅम्पचे आयोजन करण्यात येत असून लाभार्थ्यांची डीबीटी प्रक्रिया पूर्ण करून देण्याची मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके हे वेळोवेळी नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वयोवृद्ध लाभार्थ्यांना तहसील कार्यालयास येण्याची गरज भासू नये यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे .

सोमवार २८ एप्रिल रोजी कुर्ला येथे अशाच एका कॅम्पचे आयोजन प्रशासनामार्फत करण्यात आले नायब तहसीलदार प्रशांत जाधव वर यांच्या



उपस्थितीत वयोवृद्ध महिला व लाभार्थी यांचे डीबीटी प्रक्रिया पूर्ण करून घेण्यात आली यावेळी माहिती देताना नायब तहसीलदार प्रशांत जाधव यांनी नमूद केले की बीड तालुक्यात संजय गांधी योजनेचे म्हणजेच ज्यांचा वयोगट १८ ते ६५ वर्षे आहे , त्यांची लाभार्थी संख्या ८८६० इतकी आहे . या लाभार्थ्यांना राज्य शासनामार्फत प्रतिमाह १५०० रुपये इतके मानधन देण्यात येते . श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी हे ६५ वयापुढील असतात . अशा लाभार्थ्यांची संख्या ८८२४ इतकी आहे . ६५ वर्षावरील लोकांना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन अनुदान योजना सुद्धा असून त्या योजनेचे ३७३१ लाभार्थी आहेत . या योजनेत राज्य शासन १००० रुपये तर केंद्र शासन ५०० रुपये इतके मानधन लाभार्थ्यांना देत असते . डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर नोंदणी सर्वांना करणे आवश्यक आहे . त्यासाठी लाभार्थ्यांचे आधार कार्ड हे मोबाईल क्रमांकास लिंक असणे अनिवार्य आहे . डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो . आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो . तो ओटीपी सांगावा लागतो . तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते . एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते . या कॅम्पच्या वेळी कुर्ला गावच्या सरपंच मंडाबाई पांडुरंग मार्कड , उपसरपंच महादेव साहेबराव पटेकर,ग्रामपंचायत सदस्य शितल संदीप पाटील , औरंगपूरचे सरपंच गोरख महादेव चांगण, कुर्ला मंडळाचे मंडळ अधिकारी जितेंद्र वाघ , ग्राम महसूल अधिकारी संजय नेवडे , उमेश खिंडरे, दुष्यंत शेळके , सुनील प्रधान , ग्राम महसूल सेवक कृष्णा राठोड , महसूल सेवक जवरे , संगणक ऑपरेटर महेंद्र राऊत व गावकरी परीक्षित पाटील , ज्ञानेश्वर यादव,ग्रामपंचायत शिपाई बाबासाहेब कानडे , महादेव आरसुळ नवनाथ गव्हाणे , परमेश्वर गुंड,शेख खाजाभाई , भगवानराव यादव , दिगंबर शेवाळे उपस्थित होते .

यावेळी बोलताना नायब तहसीलदार प्रशांत जाधव यांनी सांगितले की फार्मर आयडी सुद्धा शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक आहे . शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढून घ्यावा . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे स्वतः तालुक्यात फार्मर आयडी काढून घ्यावा यासाठी भेटी देत आहेत . तरी शेतकऱ्यांना आवाहन राहील की त्यांनी ग्री स्टॅक प्रकल्पांतर्गत आपला फार्मर आयडी काढून घ्यावा . त्यासाठी संबंधित ग्राम महसूल अधिकारी म्हणजेच तलाठी ग्रामसेवक अथवा गावचे कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा असेही त्यांनी सांगितले.बीड तालुका प्रशासनाचा वयोवृद्ध व अडाणी लाभार्थ्यांप्रती असलेला हा कनवाळूपणा निश्चितच अभिनंदन आहे.ग्रामीण भागातील लाभार्थी , नागरिक हे खरोखरच प्रशासनाचे आभारी आहेत,अशा स्वरूपाची चर्चा यावेळी ऐकण्यास मिळाली . खचितच अशाप्रकारे प्रशासन नागरिकांसाठी दोन पावले पुढे आले तर प्रशासनाकडे नागरिक आपोआपच आदराने बघतील यात शंका नसावी.

## सरपंच चषकाचे पंचाळेश्वर येथे आयोजन

गेवराई (सरकार): भव्य ग्रामीण टेनिस क्रिकेट स्पर्धा पांचाळेश्वर सरपंच चषकाचे आयोजन गुरुवार १ मे महाराष्ट्र दिन आयोजित करण्यात आलेले असून यात सरपंच विकास शेळके, पांचाळेश्वर किकेट क्लब,ग्रा.सदस्य आण्णासाहेब शेळके , पांडुरंग चौधरी सरपंच विज्ञानेश्वर आपेगाव यांच्याकडून चार षटकार, मॅन ऑफ द सिरिज,उत्कृष्ट खेळाडूसाठी रोख पारितोषिक स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे. १ मे रोजी सकाळी नऊ वाजता प्रमुख उद्घाटनप्रसंगी पाहुणे म्हणून प्रविण कुमार बांगर पोलिस निरीक्षक गेवराई, अनंता तांगडे उपनिरीक्षक चकलांबा, विश्वजित झेंडे साहेब शाखा अधिकारी राक्षसभुवन, चक्रपाणी बाबा बीडकर, विद्याधर उदरभरे,संग्राम कोठी,नितिन कोठी, प्रभाकर शेळके,अजय शिंदे,जीवन कपाटे, सुरेश कोठी,अतुल शेळके, यांचे विशेष सहकार्य आसून सामने आत्मतीर्थ स्टेडियम पांचाळेश्वर गेवराई येथे होणार असून प्रवेश घेऊन जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक विकास शेळके सरपंच पांचाळेश्वर यांनी केलेले आहे.

## आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीयांना लोकशाही बहाल केली: पप्पू कागदे

बीड (सरकार): भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशभर होणाऱ्या शोषण मुक्तीसाठी लढा उभारून शोषत, पिडीत उपेक्षीत समाज बांधवांना मुख्य प्रकलत आणण्यासाठी त्याचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मीती करून प्रत्येकांना स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळवून दिला. हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून उपेक्षीतांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधान देशाला देवून लोकशाही बहाल केली. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी, शिवणी, खांडवी, सांडरवण, घाटजवळा, आहेर वडगांव या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय



संविधानाच्या माध्यमातून महीलांचे सक्षमीकरण-करण्यासाठी हिंदु कोड बील मंजूर करून त्यांना त्याचे हक्क व अधिकार दिले. आणि अशिक्षीत समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण मोफत व सक्तीचे करुन शिक्षणाची दारे खुली केली. एक व्यक्ती एक मताचा अधिकार देवून मतदारराजा बनविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ग, जात, धर्म, लिंग असा भेदभाव न करता भारताला संविधान देवून सक्षम लोकशाही बहाल केली. यावेळ राजू जोगदंड, किशोर कांडेकर, किसन तांगडे, सुभाष तांगडे भंते धम्मशिल थेरो, अण्णा भोले, किशोर भोले, शुभम भोले, विजय डोळस, नवनाथ डोळस, विजय सुपेकर, गोरख डोळस, राहुल कांबळे, सुनिल कांबळे, विभीषण जावळे, बंडू घुमरे, सुनिल गायकवाड,प्रमोद गायकवाड यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

## आर.बी.आय.आणि श्री गजानन बँकेच्या वतीने सायबर सुरक्षा कार्यशाळा

बीड (सरकार): भारतीय रिझर्व बँक व श्री गजानन नागरी सहकारी बँक लिमिटेड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा कार्यशाळा सोमवारी बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल ग्रँड यशोदा, बार्शी रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर कार्यशाळेला बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. आर. क्षीरसागर, बँकेचे सरव्यवस्थापक एम. एस. शेख, सहाय्यक व्यवस्थापक विलास कुंबेफळकर, वरिष्ठ व कनिष्ठ अधिकारी, व सर्व कर्मचारी, संचालक मंडळ, स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य, इतर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, एस. के. एच. मेडिकल कॉलेजचे माजी प्राचार्य अरूण भस्मे, ग्राहक, सर्व सभासद, खातेदार उपस्थित होते. सदर कार्यशाळा रिझर्व बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक मनोज पौनीकर, पल्लवी निचल यांनी सायबर सेक्युरिटी का आवश्यक आहे व त्यावर उपाययोजना काय करावी याबद्दल सविस्तर माहिती उदाहरणासह सांगितली. तसेच सायबर क्राईम पासून बँकांनी सावध कसे राहायला पाहिजे त्याबद्दल सविस्तर माहिती दिली. सदर कार्यशाळा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. शेवटी आभार बँकेचे संचालक राजेश तांगडे यांनी मानले.

## डॉ.बाबासाहेब आबेडकरांनी उपेक्षीतांच्या सामाजिक प्रगतीसाठी शिक्षणाची दारे खुली केली:पप्पू कागदे

बीड (सरकार): भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील तमाम उपेक्षीत, शोषित, पिडीत समुहातील समाज बांधवाना गुलामीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी व त्यांची सामाजिक प्रगती घडविण्यासाठी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र देवून शिक्षण मोफत व सक्तीचे केले. कारण शिक्षणामुळे माणूस सज्ञान होवून समाजाची प्रगती होते.म्हणून शिक्षणामुळेच समाज बांधव विवीध क्षेत्रातील उच्च पदावर काम करीत आहेत. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती निमीत सावरगांव (चकला), मंझरी, आनंदवाडी सुर्डी थोट या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, शिक्षणामुळे माणसे, समाज, घरे व



पिढ्या सुधारतात आजच्या काळात गुणवत्ता मिळविण्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे. कारण शिक्षणामुळे नव क्रांती घडते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला महत्व देवून शिक्षण भोफत वसक्तीचे केले. परंतू आजच्या काळात इतक्या सुविधा उपलब्ध असतांना सुद्धा समाज बांधवामध्ये शिक्षणाचा अभाव दिसून येत आहे. स्वःताची व परिवाराची प्रगती साध्य करण्यासाठी शिक्षण घेणे काळाची गरज आहे.

यावेळी अरुण भालेराव, किसन तांगडे, अजिनाथ गवळी, शहादेव खेडकर, बासाहेब नागरे,एस.टी. गायकवाड, फैय्याज शेख, प्रकाश खेडकर, दशरथ गवळी, विजय मोरे, सतिष मुरकुटे, मनोज परदेशी, प्रकाश साळवे, पंडीत जावळे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, अशोक मस्के, बबन मस्के, नाना कांबळे, दयानंद उबाळे, बाबसाहेब डोंगरे, नामदेव उबाळे यांच्यासह शेकडो भीम अनुयायी उपस्थित होते.

## सोने सावरगाव ग्रामस्थांची भगवानगडाला १ कोटी ३ लाख रुपये देणगी जाहीर

भगवानगड (सरकार): श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षितांच्या प्रगतीसाठी लढा उभा केला-पप्पू कागदे

बीड (सरकार): भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी व उपेक्षितांना त्यांच्या हक्काची व अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी जाती व्यवस्था बदलण्याचे काम करीत भारतीय संविधानाची निर्मिती करून भारतीय लोकशाही मजबूत केली. त्याचबरोबर, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रवाहात आणण्यासाठी व साक्षर समाज घडविण्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली. आपल्या हक्क व अधिकारांसाठी लढण्यास प्रवृत्त केले. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारीत असलेली समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करीत समाज बांधवांच्या प्रगतीसाठी देशभर लढा उभा केला. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड



जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त तलवाडा, घाटसावळी, पारगांव (सि), नाळवंडी, ताडसोन्ना या गांवी केले. पुढे बोलतांना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून अठरा पगड जातीच्या समाज बांधवांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधानात अनेक कलमांची नोंद करून त्याचे हक्क व अधिकार मिळवून दिले. थोर महापुरुषांचे विचार आत्मसात करून आगामी काळात युवकांनी व्यसनमुक्त समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी महापुरुषांचे विचार घरा-घरात व गावा-गावात पोहचविण्याचे काम करावे. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडीत, किशोर कांडेकर, किसन तांगडे, शाहु डोळस, सुभाष तांगडे, संजय गव्हाणे, भैय्या भालेराव, आप्पा भालेराव, सुनिल कांडेकर, भाऊसाहेब भालेराव, विजय डोंगरे, अशोक आठवले, विनोद आठवले, आंबादास आठवले, युवराज डोंगरे, गिताराम डोंगरे,माऊली डोंगरे,नामदेव वाघमारे यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

## प्राणीमात्रांचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्र्यांचं पशुधनांविषयीचं मातृवत 'वात्सल्य' आलं समोर !

परळी (सरकार): राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची संवेदनाशीलता सर्व परिचित आहे. त्याचबरोबर त्यांचे श्वानप्रेमही सर्वांना ज्ञात आहे.एक व्यासंगी, परखड वक्ता, अभ्यासू खंबीर लोकनेता अशी प्रतिमा असलेल्या पंकजाताई मुंडे यांच्या अतिशय संवेदनाशील व मातृवत वात्सल्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची अनुभूती अनेकवेळा येते.असाच काहीसा प्रसंग काल बघायला मिळाला. या प्रसंगातून व्यक्ती म्हणून पंकजाताईंचा प्राणीमात्रांबद्दलचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई म्हणून पशुधनांविषयीचे त्यांचे मातृवत 'वात्सल्य' समोर आले आहे.



कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी स्वतःच्या घरी लेकरं सांभाळावे या पद्धतीने आठ श्वानांच्या पिलांचा सांभाळ केलेला होता.यापैकी दोन पिलं त्यांनी पंकजाताई मुंडे यांना देवू केली.श्वानप्रेमी असलेल्या पंकजाताई व त्यांचा सुपूत्र आर्यमान यांना अतिशय आनंद झाला.या नविन दोन श्वानांच्या आगनमनाचा उत्साह व उत्सुकता त्यांना लागलेली होती. अतिशय भावनिकतेने व जिव्हाळ्याने कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी या पिलांचा सांभाळ केलेला होता. त्यांनाही या पिलांचा विरह सहन होणारा नव्हता. त्यामुळे सर्व प्रकारची काळजी घेत कोल्हापूरहून मुंबई पर्यंतचा प्रवास करत शिंदे कुटुंब ही पिले घेऊन आली. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी या पिलांना आणण्यात आले यावेळी सोनाली शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांचे पंकजाताईंनी कृतज्ञतापूर्वक अतिशय प्रेमाने स्वागत केले.

## परळीत १ मे रोजी काँग्रेसचा सद्‌भावना संकल्प सत्याग्रह

### प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खा.रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेस नेत्यांचा सहभाग

### परळी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ;काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांचे आवाहन

मुंबई (सरकार): राज्यात सामाजिक सौहार्द व महाराष्ट्र धर्म वाढीस लागावा यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने सद्भावना यात्रांचे आयोजन केले आहे. दिनांक १ मे रोजी बीड जिल्ह्यातील परळीमध्ये प्रदेश काँग्रेसच्या वतीने सद्भावना संकल्प सत्याग्रह आयोजित केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या सत्याग्रहात काँग्रेसच्या नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत परळी शहर आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या सत्याग्रहात



सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले आहे.

या सद्‌भावना संकल्प सत्याग्रहाच्या तयारीसाठी आज परळी येथे काँग्रेस पदाधिका-यांची बैठक पार पडली या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना राहुल सोनवणे म्हणाले की, परभणी, बीड, नागपूरसह राज्यात नुकत्याच घडलेल्या विविध घटनांनी राज्यातील सामाजिक शांतता भंग करण्याचे काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी राज्यात काही शक्ती जाणीवपूर्वक वातावरण बिघडवून महाराष्ट्र अस्थिर व अशांत ठेवण्याचे पातक करत आहेत. दुर्दैवाने या विघातक शक्तींना सत्तेतून आशिर्वाद मिळत आहे. परंतु काँग्रेस पक्ष राज्यातील विविध जाती धर्मातील लोकांमधील एकता कायम रहावी व सामाजिक सौहार्द वाढावे यासाठी सद्भावना यात्रा काढत आहे. याआधी मस्साजोग ते बीड व नागपूर शहरात सद्भावना यात्रा काढण्यात आली, जनतेने या यात्रांना प्रचंड प्रतिसाद दिला असून नाशिकमध्येही अशीच सद्भावना यात्रा होत आहे. गेल्या काही दिवसांपासून बीड आणि परळी परिसरातील घटनांमुळे या परिसरात सद्भावनेची आवश्यकता असल्याने परळीतील मोंढा परिसरातील गांधी स्मारक स्तंभ येथे हा सद्भावना संकल्प सत्याग्रह होत आहे, या सत्याग्रहाला परळी आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, प्रतिष्ठित नागरिक अशा सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले आहे.

यावेळी परळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष बहादूर भाई, ड प्रकाश मुंडे, प्रकाशराव देशमुख, शिवाजीराव देशमुख यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)